डॉ. के. एम. लोखंडे

# मराठी साहित्याचा इतिहास

## इ.स.१८१८ - २०१०

Kripa Drishti Publications, Pune.

# मराठी साहित्याचा इतिहास
# इ. स. १८१८ - २०१०

डॉ. के. एम. लोखंडे

**Kripa-Drishti Publications, Pune.**

Book Title: **मराठी साहित्याचा इतिहास इ. स. १८१८ - २०१०**

Editor: **डॉ. के. एम. लोखंडे**

Authored by: **प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील,**

**डॉ. सुलभा उल्हास पाटील**

1st Edition

ISBN: **978-93-90847-35-8**

9 789390 847358

Published: **Oct 2021**

**Publisher:**

**Kripa-Drishti Publications**

A/ 503, Poorva Height, SNO 148/1A/1/1A,
Sus Road, Pashan- 411021, Pune, Maharashtra, India.
Mob: +91-8007068686
Email: editor@kdpublications.in
Web: https://www.kdpublications.in

© **Copyright KRIPA-DRISHTI PUBLICATIONS**

All Rights Reserved. No part of this publication can be stored in any retrieval system or reproduced in any form or by any means without the prior written permission of the publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages. [The responsibility for the facts stated, conclusions reached, etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them, whatsoever.]

# CONTENT

**1. मराठी साहित्याचा इतिहास इ.स. १८१८ – २०१० -** *प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील*......................................................................**1**

**2. मराठी साहित्याच्या इतिहासातील एक लक्षवेधक पान - डॉ. आ. ह. साळुंखे -** *डॉ. सुलभा उल्हास पाटील*...................................................**13**

ISBN: 978-93-90847-35-8

# 1. मराठी साहित्याचा इतिहास इ.स. १८१८ - २०१०


## प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील

श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय,
मालेगाव, मालेगाव कॅम्प जि. नाशिक
मराठी विभाग.


### 1.1 प्रास्ताविक:

१८१८ ते २०१० या कालखंडातील मराठी साहित्याचा इतिहास बघताना या कालखंडातील प्रमुख लेखक,प्रमुख प्रवृत्ती,वान्मयप्रकार ,कालखंडाचे विविध टप्पे आणि सीमा यांचा विचार करणे गरजेचे आहे.

1. १८०० ते १८७४

2. १८७४ ते १९२०

3. १९२० ते १९६०

4.१९६० ते आजपर्यंत - काही अभ्यासकांनी या कालखंडाना अनुक्रमे भाषांतरयुग,निबंधामालायुग,सुवर्णयुग,साठोत्तरी प्रवाह अशी नावेही दिलेली आहेत .१८०० ते १८७४ हा कालखंड म्हणजे आधुनिक मराठी वाङ्मयाचे आरंभस्थान. या कालखंडाचा इतिहास हा आरंभाचा इतिहास आहे. या कालखंडास अव्वल इंग्रजी कालखंड असेही म्हंटले जाते. या कालखंड संदर्भात अभ्यासकांनी काही मत,मतभेद मांडलेले आहेत.,"या पाऊणशे वर्षात एकही अलौकिक ग्रंथ मराठीत झाला नाही", "हा कालखंड म्हणजे भाषांतरयुग होय ", "आधुनिकतेचा स्वीकार करण्याची क्रिया या कालखंडात घडू लागली होती.", "हा कालखंड प्राधान्याने भाषांतराचा असला तरी पुढील उज्ज्वल कालखंडाच्या पूर्वतयारीचाही होता. त्यास केवळ भाषांतरयुग संबोधने योग्य नाही. अशाप्रकारे या कालखंडात अभ्यासकांनी विविध मते मांडलेली आहेत.

अभ्यासकांनी विविध मतप्रवाह वरीलप्रमाणे मांडली आहेत. काहींनी या कालखंडाचा प्रारंभ १८०० ऐवजी १८१८ मानला आहे. कारण याच सनाला मराठी राजवटीची अखेर झाली. आणि ब्रिटीश राजवटीचा प्रारंभ झाला. या राजकीय स्थित्यंतराचे वाङ्मय इतिहासावर ही परिणाम झाले. हा केवळ राजकीयदृष्ट्या महत्वाचा कालबिंदू झाला आणि एक राजवट संपली कि लगेच त्या घटनेचे वाङ्मयीन परिणाम होतातच असे नाही. यापेक्षा या कालखंडाचा प्रारंभ इ.स. १८०० पासून मांडायची महत्वाची कारणे आहेत. 'मुद्रणकलेचा प्रारंभ' या घटनेमुळे वाङ्मय निर्मितीस मोठी चालना मिळाली. मराठी भाषेतील पुस्तकांना पहिला मुद्रण संस्कार इ.स. १८०५ मध्ये कलकत्त्याच्या जवळ श्रीरामपूर येथे झाला. याचा अर्थ असा कि १८०० च्या

जवळपास अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या जोपासनेला प्रारंभ झाला. असेही मत अनेक अभ्यासकांनी मांडले आहे. १८०० ते १८७४ या कालखंडातील साहित्यनिर्मितीमागे प्रेरणा विविध स्वरूपात होत्या. प्रस्तुत कालखंडातील साहित्याबद्दल प्रा.गो.म.कुलकर्णी म्हणतात, इंग्रजी राजवटीचे आगमन गद्याला जितके प्रेरक तितके काव्याला नाही. इंग्रजी राजवटीचा काळ हा भावनेपेक्षा बुद्धीवर,संश्लेषनापेक्षा विश्लेषणावर, आणि अध्यात्मिक चर्चेपेक्षा भौतिक घडामोडीवर भर देणारा ठरला. उपयुक्त ज्ञानाचा प्रसार हे ह्या काळाचे ब्रीद होते.

कालानुक्रमे ह्या साहित्य इतिहासात कथा, कादंबरी, काव्य, नाट्य, निबंध वाङ्मय, चरित्र, नियतकालिके, वृत्तपत्र, पाठ्यपुस्तकांची भाषांतरे, साहित्यविचार अशा विविध साहित्यप्रकारात लेखन होत राहिले. विषय अत्यन्त व्यापक आहे.कालखंड देखील जवळजवळ २०० वर्षांचा आहे. अनेक मत मतांतर विचारप्रवाह आहेत. प्राचीन साहित्य, अर्वाचीन साहित्य आधुनिक साहित्य,नवआधुनिक साहित्य असे मुख्य प्रवाह त्यात अनेक साहित्यप्रकार ,प्रवाह वेगवेगळ्या पातळ्यांवर उदयास आलेले दिसतात.आणि म्हणून यात एकेक कालखंड नुसार किंवा साहित्याप्रकारनुसार अभ्यास करणे जास्त संयुक्तिक होईल असे मला वाटते. विविध वाङ्मय प्रकारानुसार हि विवेचन करता येईल किंवा कालखंडानुसार देखील करता येईल ह्या प्रकरणात आपण आत्मचरित्र ते आत्मकथन ह्या वांग्मय प्रकाराचा विस्तृत धांडोळा घेणार आहोत. त्यात ही आधुनिक साहित्याचा प्रामुख्याने विचार करणार आहोत.त्या त्या विशिष्ट काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि अन्य प्रकारच्या समस्या,त्यातील ताण, अंतर्विरोध त्या काळातील विचार यांचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. त्यामुळेच प्राचीन,अर्वाचीन आणि समकालीन अशा परंपरा साहित्यात मानल्या गेल्या.१९४५ नंतरच्या साहित्याला 'समकालीन साहित्य' असे नाव देण्यात आले. १९४५ ते ६० आणि १९६० ते ८५ असे दोन कालखंड समकालीन साहित्याचे मानले जातात. १९४५ ते १९६० हा नवसाहित्याचा कालखंड आणि १९६० नंतरचा नवसाहीत्योत्तर कालखंड असेही मानले गेले.

आता आपण ज्या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास करणार आहोत तिकडे वळू या. ह्या प्रकरणात आपण स्त्री आत्मकथनांचे वाङ्मय इतिहासात काय महत्वाचे योगदान आहे ते बघणार आहोत.

## मराठी साहित्य इतिहासात स्त्री आत्मकथनांचे मोलाचे योगदान:

'आत्माभिव्यक्ती' हि मानवाची सनातन गरज आहे. त्यातून त्याला मिळणारे समाधान अवर्णनीय आहे. त्यामुळेच माणूस स्वताला व्यक्त करण्यासाठी त्या प्रकटीकरणासाठी चित्र,नृत्य,संगीत,लेखन अशा अनेक लालित्याने परिपूर्ण असणाऱ्या माध्यमांचा आधार घेतो. आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार अव्वल इंग्रजी काळापासून आपल्याकडे रूढ झाला. 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि 20 व्या शतकाच्या अगदी मध्यापर्यंतचा कालखंड महाराष्ट्रीय समाजजीवनाचा क्रांतिकारक कालखंड मानला जातो. या काळात सामाजिक, राजकीय,धार्मिक प्रबोधन झाले होते.नवीन विचारांनी,ध्येयांनी आणि सुधारणांनी भरलेला हा काळ होता. स्वातंत्र्यापूर्वी अनेक ध्येयांनी भारलेला समाज स्वातंत्र्यानंतर मनोरंजनाकडे,सौंदर्यवादाकडे झुकू लागला. वेगवेगळी क्षेत्रे उदयाला आली.

स्त्रीशिक्षण,स्त्रीमुक्ती यांना महत्व आले. अनेक क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर राहू लागल्या. आपापल्या अनुभवांचे लेखन आत्मचरीत्राद्वारे करू लागल्या. स्त्रियांच्या अनुभवाला भावनेची जोड असल्यामुळे त्यांची आत्मचरित्रे जास्त वाचली जाऊ लागली. तसे पाहिले तर प्राचीन काळातील पुराण वाङ्मयापासून आत्मकथन पद्धतीला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसते. संत साहित्यात संत नामदेव, संत जनाबाई, संत एकनाथ, संत तुकाराम, व संत बहिणाबाई यांच्या अभंगात आत्मचरित्रपर उल्लेख आलेले आहेत. परंतु ही जाणीवपूर्वक लिहलेली आत्मकथने नाहीत. ह्या संतानी भक्तीपोटी आणि विठ्ठल प्रेमापायी हे आत्मपर निवेदन केलेलं आहे.संतानंतर आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासात स्त्रियांनी लिहलेली आत्मकथन हि स्वताच्या दुखः वेदनांना आणि सहज सुंदर भावनांना व्यक्त करणारी होती.

स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात शिक्षणाने आणि अर्थप्राप्तीने स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाचा सर्व बाजूंनी विकास होऊ लागला.१९६० ते १९९० हा स्त्री प्रश्नांची चर्चा करणारा कालखंड होता.त्यामुळे स्त्रियांना आत्मभान येऊ लागले होते. स्त्रीमुक्तीसाठी राजकारण, कायदा, साहित्य इ. अनेक आघाड्यांवर संघर्षशील राहून अस्मिता प्राप्तीसाठी अनेकांगांनी उठाव होत स्त्री व्यक्त होऊ लागली होती. या आश्चर्यकारक बदलाच्या ढोबळ आणि सूक्ष्म खुणा स्त्रियांनी निर्माण केलेल्या साहित्यात उमटल्या. सोसलेले खरे अनुभव वास्तवता तिच्या शब्दातून ती शब्दातून समाजासमोर मांडू लागली. अशा तऱ्हेने आत्मकथन या वाङ्मय प्रकारचा विकास होत गेला. कथा,काव्य,नाटक, कादंबरी इ.साहित्य प्रकारातून समाजजीवनाचे खरे चित्र साकार होते पण ते बहुतांशी काल्पनिक असते. आत्मचरित्र हा असा वाङ्मय प्रकार आहे की, यातून व्यक्त होणारे अनुभव हे स्वतः अनुभवलेल्या जीवनाचे चित्र हुबेहूब उभे करणारे असतात. आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार प्राचीन मराठी साहित्यात दिसून येत नाही. कारण भारतीय साहित्य परंपरेत 'आत्माभिव्यक्ती' करणे श्रेयस्कर मानले जात नव्हते. आपल्या जीवनातील बऱ्यावाईट आठवणी सांगाव्यात त्या सांगताना आपल्या जीवनप्रवासाकडे मागे वळून पहावे आणि आपण जीवनात काय कमावले आणि काय गमावले याचा शोध घेण्याचा प्रयत्न करावा,ही आत्मचरीत्रामागील महत्वाची प्रेरणा आहे.

**आत्मचरित्र म्हणजे काय:**

आत्मचरित्रकार स्वतःचे जीवन मागे वळून न्याहाळण्याचा प्रयत्न करीत असतानाच स्वतःच्या आयुष्याचे 'स्व' चे एक सुसंगत असे चित्र साकारण्याची धडपड करीत असतो.म्हणजेच 'स्व' व्यक्तिमत्वाचा शोध किंवा आत्मबोध हा आत्मचरित्राचा एक महत्वाचा पैलू असतो. प्रा.अ.म. जोशी आपल्या 'चरित्र आणि आत्मचरित्र' या पुस्तकात म्हणतात, प्रसिद्ध फ्रेंच लेखक रुसो याने आपल्या आत्मचरित्राला 'कबुली जबाब' (confession) असेच नाव दिले आहे. इतकेच नव्हे तर सुरुवातीला त्याने असे स्पष्ट म्हंटले आहे की ,जेव्हा मला देवाघरचे बोलावणे आले की मी माझे आत्मचरित्र देवासमोर ठेवेन आणि म्हणेन की,' देवा मी अशा तऱ्हेने जगात वावरलो आहे, माझी पुण्यकृत्ये व पापे मी प्रामाणिकपणे तुझ्यासमोर ठेवीत आहे', अशा तऱ्हेने आत्म्चारीत्राकडे पाहण्याचा प्रत्येक लेखकाचा हेतू वेगवेगळा असू शकतो. आत्मचरित्र लेखक आपल्या भूतकाळातील आणि वर्तमानकाळातील घटना प्रसंगाचे,व्यक्तींचे चित्रण तो करतो.

ते करीत असताना स्वतःच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीस कारणीभूत झालेल्या व्यक्ती यावर अधिक भर देतो. "स्वतःच्या जीवनाचे दुरस्थपणाने केलेले अवलोकन व त्यासंबंधीचे कथन म्हणजे आत्मचरित्र". इतिहास हे एखाद्या समाजाचे चरित्र असेल तर आत्मचरित्र हा एका व्यक्तीचा इतिहास असतो. आत्मचरित्राचे स्वरूप समजावे म्हणून त्यासाठी आत्मचरित्राच्या विविध व्याख्या केलेल्या आढळतात." 'स्व' जीवन तटस्थपणे न्याहाळून त्यातून आवश्यक त्या बाबीची निवड करून त्यांचे प्रांजळ निवेदन व कलात्मक मांडणी यातून 'स्व' चित्र रेखाटणे म्हणजे आत्मचरित्र होय". हि डॉ.विमल भालेराव यांनी केलेली व्याख्या त्या अर्थाने परिपूर्ण आहे. डॉ.रा.ग.जाधव मराठी विश्वकोशात आत्मचरित्राची व्याख्या देताना म्हणतात,"आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्वाचे स्वतः लेखनरूपाने घडवलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय".एकूणच काय तर आत्मचरित्र म्हणजे 'स्व' व्यक्तिमत्वाचा शोध होय. अशा अनेक व्याख्या या प्रकाराबद्दल आहेत. मात्र आता आपण आत्मकथन या वाङ्मय प्रकारचा विकास कसा होत गेला ते बघू. मात्र त्यापूर्वी आपण आत्मचरित्र व आत्मकथन यातील फरक अभ्यासणे महत्वाचे आहे.

### आत्मचरित्र व आत्मकथन यातील फरक:

आत्मचरित्र व आत्मकथन ह्यातील सीमारेषा धूसर आहेत."१९६० नंतर मध्यमवर्गीय सवर्ण समाजाबाहेर, गावकुसाबाहेर राहणाऱ्या उपेक्षित भटक्या जाती-जमातीतील लेखकांनी जी 'आत्मचरित्र' लिहिली त्यास **'आत्मकथन'** असे म्हंटले जाते. या आत्मकथनांमुळे अनेक जातीजमातींचे जीवन यांच्या श्रद्धा, समजुती, व्यवहार आणि त्यांच्या दुख्खांचे, कष्टाचे भीषण रुप प्रथमच वाचकांसमोर आले.आत्मचरित्रात आत्मचरित्रकार स्वतःच्या कर्तृत्वाचा व जीवनाचा आलेख वाचकांसमोर ठेवत असतो. त्यात आत्मप्रशंसाही असते.आत्मचरित्राचा हा पारंपारिक उद्देश आत्मकथनंमागे नसतो. विशिष्ट समाजव्यवस्थेतील धारणांमुळे जे यातनामय जीवन आपल्या म्हणजेच आपल्या जातीजमातीच्या वाटेला आले त्याचे कथन करणे होय. वरील संदर्भात केवळ उपेक्षित, दलित, भटक्या, जाती-जमाती यांचा उल्लेख असला तरी स्त्रियांचा उल्लेख होणेही तितकेच महत्वाचे आहे.

### स्त्री आत्मकथनांचे मोलाचे योगदान:

आधुनिक काळात रमाबाई रानडे यांनी १९१० साली लिहलेले "आमच्या आयुष्यातील काही आठवणी" हे मराठी वाङ्मयाच्या इतिहासकारांनी पहिले स्त्री आत्मकथन मानले आहे. रमाबाईंच्या लेखनानंतर १९७५ पर्यंत तीस ते पस्तीस आत्मकथने लिहली गेली. १९७६ पासून हे प्रमाण वाढले. पहिले कारण म्हणजे हंसा वाडकर यांचे 'सांगते ऐका' ( १९७० ) या आत्मकथानाने स्त्री आत्मकथनांच्या इतिहासात एक नवा पाया रचला. एका स्त्रीने पातीव्रत्यांच्या कल्पना झुगारून देवून स्वतःच्या अंतरंगातील मोह, ताणतनाव मोकळ्या मनाने वाचकांसमोर मांडले तसेच दुसरे महत्वाचे कारण म्हणजे १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष असल्याने या वर्षात जागतिक, राष्ट्रीय,राजकीय,सामाजिक संदर्भात निरनिराळे विचार पुढे आले.त्यातूनच स्त्री च्या अस्मितेला नवी जाग आली.

१९७५ नंतर अनेक वेगवेगळ्या क्षेत्रातल्या स्त्रियांची आत्मकथने उदयास आली. १९८४ साली मल्लिका अमरशेख यांनी 'मला उध्वस्त व्हायचय' हे आत्मकथन लिहिले.तसे पाहिले तर मल्लिका अमरशेख या स्वातंत्र्यानंतरच्या बदलत्या आधुनिक स्त्रीचे प्रातिनिधिक रूप म्हणायला हरकत नाही. स्त्रीमुक्ती चळवळीचा परिपाठ त्यांच्या विचारात दिसतो. म्हणून त्यांच्या या आत्मकथनातून स्त्रीवादाची धाडसी रोपं मराठी साहित्यात मूळ धरू लागल्याचे दिसते. मल्लिकाने लज्जा व संकोच सारून धिटाईने कोंडी फोडली. समाजाकडून जे देखलेपणाच्या आवरणात दडपलेल कौतुक मिळत होते ते तिने नाकारले. घराघरातील जगणाऱ्या स्त्रियांचा दिखाऊ, पोकळपणा फाडून खऱ्या अनुभवांचे सर्व तपशील लेखनात येऊ शकतात. ही जाणीव मल्लिकाने आपल्या लेखनातून मराठी साहित्याला करून दिली.

दलित आत्मकथनातून हि स्त्री मुक्तीचा आक्रोश ऐकू येतो. उच्च मध्यम वर्गातल्या स्त्रीपेक्षा 'दलित स्त्री' अधिकच दुय्यम आणि भरडली जाणारी होती, हे दलित स्त्रीचे भरडलेले जीवन कुमुद पावडेंच्या 'अन्तःस्फोट' आणि नजूबाई गावित यांच्या 'आदोर' ह्या आत्मकथनातून दिसते. या आत्मकथनातून पुरुषप्रधान समाजव्यवस्था आणि जातीय विषमतेतून आलेली अशी दुहेरी गुलामगिरी स्त्रीला सोसावी लागताना दिसते. बेबी कांबळे यांच्या 'जिणं आमुचं' मध्ये स्त्रियाच स्त्रियांना कशा छळतात,याचे चित्रण येते तर जनाबाई गीऱ्हे यांच्या 'मरणकळा' मधील स्त्रियांनी बिकट परीस्थितीतून वाट काढत समाजाच्या रीतीरीवाजाविरुद्ध शिक्षण घेतलं.

अज्ञानाच्या, अत्याचाराच्या, छळाच्या व अन्यायाच्या दलदलीतून या स्त्रिया स्वतःच्या जिद्दीने व चिकाटीने बाहेर पडू पाहणाऱ्या आहेत. त्यांच्या सोशिकतेचे व आत्मभानाचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. अशा तऱ्हेने स्त्री आत्मकथनातून व्यक्त होऊ लागली होती. मग ती कोणत्याही स्तरातली असो,तिच्या जीवनात मोकळेपणा येऊ पाहत होता. १९१० ते२०१० पर्यन्त स्त्रियांच्या आत्मकथनात विविध अंगानी विविध स्तरावर बदल होत गेले. सुरुवातीच्या काळात आत्मकथन लेखन हे पतीपरायण होती. पतीचेच चरित्र व्यक्त करणारी होती. पुरुषप्रधान संस्कृतीची वाट चालणारी होती. १९८४ च्या आसपास आलेली स्त्रियांची आत्मकथने हि निर्भीड आणि आत्मभान व्यक्त करणारी ठरली.

'स्व' च्या जाणीवा व्यक्त करणे हाच मूळ उद्देश ठेवून त्या आत्मकथनांचे लेखन झाले व २००० नंतरची आत्मकथनात रूढीप्रियता नसून केवळ स्वःताची दुखः मांडणे हा देखील उद्देश नाही तर समन्वयाच्या भूमिकेतून व स्थिर मनोवस्थेला लेखिकांनी व्यक्त केले आहे.

परिवर्तनाच्या लढ्यातून स्त्रियांना आलेले स्वतःच्या माणूसपणाचे, क्षमतेचे ओजस्वी भान अख्या समाजाला घेऊन व्यक्त होते, हे आत्मभान एका व्यक्तीचे नाही. ते साऱ्या जातीचे प्रातिनिधिक आहे. सर्वसाधारणपणे आत्मकथन ह्या प्रकाराला कमी लेखले जाते. कथा,कविता,नाटक,कादंबरी यांच्याशी तुलना करून आत्मकथनाना कमी लेखले जाते. स्वतःच्या आयुष्याचा लेखाजोखा,आपल्या खाजगी जडणघडण यांचे चित्र सार्वजनिकपणे मांडणे तसे अवघडच असते.

## २१ व्या शतकातील काही प्रातिनिधिक आत्मकथनांचा अभ्यास:

पतीपरायणतेनंतर व अन्यायविरुद्ध लढ्यातून स्त्रियांना स्वतःच्या क्षमतेची झालेली ओळख संपूर्ण समाजाला सोबत घेऊन व्यक्त होते व तसेच या आत्मकथनातून व्यक्त होणारे आत्मभान हे केवळ ते आत्मकथन लिहिणाऱ्या स्त्रीचे नाही तर ते साऱ्या स्त्री जातीचे प्रातिनिधिक आहे.शके १२०८ च्या सुमारास आद्य मराठी कवयित्री महदाइसापासून संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत बहिणाबाई,ते १९१० मधील रमाबाई रानडे यांच्यापर्यंत ,त्यांच्यापासून २०१० मधील 'सर आणि मी' पर्यंत स्त्रियांचे लेखन विविध भावनिक टप्प्यातून गेले.

१९ व्या शतकात स्त्रीचे स्वतंत्र स्थान व तिचे हक्क तिला लाभण्यासाठी आपल्याकडे स्वंतत्र लढा सुरु झाला. रमाबाई रानडेंच्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी 'नंतर 'स्मृतिचित्रे' हे लक्ष्मीबाई टिळक यांचे आत्मचरित्र खूप गाजले.कारण साधी व घरगुती आकर्षक भाषाशैली असल्याने व मनाचा मोकळेपणा असल्याने हे आत्मचरित्र मनमोहक व ओघवते होते. १९७५ पूर्वीच्या स्त्री आत्मचरित्र लेखनात स्वतःचे दुखः विसरणे,लोकजागृती,कबुलीजबाब,स्व-कर्तृत्व सांगणे हे अनुभव साध्य करण्याचे प्रयत्न होताना दिसतात.१९७५ हे आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष घोषित केले गेले व स्त्रिया स्वतःच्या प्रश्नांकडे जीवनाकडे जाणीवपूर्वक पाहू लागल्या. अन्यायाविरुद्ध संघर्षाची भाषा बोलू लागल्या. शिक्षणाची संधी स्त्रियांना हळूहळू वाढू लागल्या आणि स्त्रियांचे जीवन बदलू लागले.'आहे मनोहर तरीही' हे आत्मचरित्र नवरा या नात्यात कमी पडणाऱ्या पु. ल.देशपांडे यांच्या व सुनीताबाईंच्या सहजीवानाबाबत खंत मांडताना दिसते. दलित स्त्रियाही स्वतःला व्यक्त करू लागल्या. 'अन्तःस्फोट','आदोर',जीन आमुच','मरणकळा' या आत्मकथनांतून दलित स्त्रिया परखडपणे व्यक्त झाल्या.

२१ व्या शतकातल्या स्त्रिया मात्र आत्मकथनांतून स्वतःची आत्माभिव्यक्ती एका नव्या धिटाईने करताना दिसतात. एका नव्या आत्मविश्वासाने स्वतःला व्यक्त करू पाहत होती. तिचा संघर्ष बाजूला ठेवून ती स्थिरपणे ती एक माणूस म्हणून स्वतःला व्यक्त करताना दिसत होती. हि आत्मकथने परिवर्तन दर्शवणारी आहेत. एकसुरी नाहीत. कोणताही विद्रोह न दर्शवता अत्यंत सहजपणे मांडलेला आहे. स्त्री पुरुष दरी कमी झालेली दिसते. आधुनिकतेने जे बदल आणले त्यांनी स्त्रियांना दमनाचे नवे मार्ग दिलेत. त्यातून झगडण्याचे बळ मिळाले. २१ व्या शतकातील आत्मकथने या काळाची सामाजिक व्यवस्था मांडणारे दस्तऐवज ठरतात.

सर्वसाधारणपणे आत्मकथनाना दुय्यम मानले जाते. आयुष्याचा लेखाजोखा खाजगी जडणघडणीचे चित्ररूप सर्वांसमोर मांडणे अवघड असूनही पुन्हा पुन्हा स्वतःला पडताळून ते व्यक्त केलेले दिसत आहे. म्हणून ते अधिक ठळकपणे व्यक्त होताना दिसते. अलीकडच्या ह्या आत्मकथनातून केवळ व्यक्त होणे हा उद्देश नाही तर 'स्व' चा सहजतेने मांडलेला प्रवास आहे. स्वतंत्र अस्तित्वाचाच विचार न करता कुटुंब,समाज, संस्कृती यांचीही जपणूक करण्याचा प्रयत्न केलेला आहे.१९१० पासून सुरुवात झालेल्या स्त्री आत्मकथनांना कालानुरूप वेगवेगळे आयाम लाभत गेले. त्यात हळूहळू लक्षात न येणारा बदल होत गेला. या साहित्यामुळे

अलीकडची सामाजिक आणि ऐतिहासिक परिस्थिती लक्षात येते. १९१० ते १९७५ या काळात पुरुष वर्गावर फारसे आरोप स्त्रिया करत नाहीत. याच काळात आत्मकथन आणि आत्मचरित्र यातील सीमारेषा धूसर होताना दिसते.प्रत्येक आत्मकथन एका नव्या क्षेत्रातल्या स्त्रीची ओळख करून देते.म्हणून ते एक महत्वाचा सामाजिक दस्तऐवज ठरते. अलीकडच्या ह्या आत्मकथानात स्त्री पुरुष समानता मांडली आहे. ते मांडताना स्त्रीवाद, स्त्री-पुरुष समानता,कौटुंबिक,सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावरील स्त्री-पुरुष सुसंवाद यांबाबत विचार झालेला आहे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार करताना स्त्री-पुरुष या नैसर्गिक निर्मितीचा विचार करावा लागेल. 'लिंग' आणि 'लिंगभाव' या संकल्पना लक्षात घ्याव्या लागतील. बहुतेक सर्व मानवी समाजामध्ये स्त्री-पुरुषांमध्ये विषमता दिसते. नरातून पुरुषत्व, मादीतून स्त्रीत्व निर्माण झाले. हा नैसर्गिक लिंगभेद कृत्रिमपणे सामाजिक लिंगभावात रुपांतरीत केला गेला व त्यालाच नैसर्गिक मानले गेले. त्यातूनच स्त्रियांची आर्थिक,मानसिक,सामाजिक शोषण करण्याची वाट मोकळी होत गेली. त्यातून पुढे स्त्रीवाद हि एक जाणीव निर्माण झाली. या स्त्रीवादातून स्त्री-पुरुष समानता निर्माण झाली. त्यातूनच स्त्रीमुक्तीची चळवळ निर्माण झाली. लिंगभेदाच्या पलीकडे माणूसपणाकडे पोह्चण्यासाठीचे प्रयत्न म्हणजे 'स्त्रीमुक्ती चळवळ' होय.

२१ व्या शतकातील आत्मकथनातून स्त्रीपुरुष समानतेचे दर्शन होते या काळातील स्त्री-पुरुष समानतेचे दर्शन होते. आत्मकथनातील स्त्री-पुरुष परस्परसंबंध,तत्कालीन सामाजिक-सांस्कृतिक बदलांची साक्ष देणारे आहेत. मूल्य बदलत गेली, स्त्रीचे समाजातील स्थान बदलत गेले. तिचे विचार, आचार, वर्तन, नियम, बदलू, लागले.पण हे सारे घडत असताना तिला पुरुषांची,त्याच्या प्रेरणेची आणि आधाराची साथ होती. यात विचार करताना काही ठळक आत्मकथन बघता येतील.उदा. कुणास्तव कुणीतरी ( यशोदा पाडगावकर ),समिधा (साधना आमटे ), ( चाकाची खुर्ची ), आयदान ( उर्मिला पवार ), हृदयस्थ (अलका मांडके ), योगायोग ( उषा दर्डा ), भोगले जे दुखः त्याला (आशा आपराद ), संग्राम ( सीमा साखरे ), बारबाला ( वैशाली हळदणकर ), मेरीगोल्ड (मंदाकिनी जाधव ), मी नंदा ( नंदा मेश्राम ), मास्तरांची सावली ( कृष्णाबाई सुर्वे ), धाकट्या नजरेतून ( अलका गोडे ), सर आणि मी ( ज्योत्स्ना कदम ) अशी अनेक आत्मकथन लक्षात घेण्यासारखी आहेत.समिधा पाहताना लक्षात येत की साधना आमटे आणि बाबा आमटे यांचे सहजीवन सामाजिक सेवेत समर्पित होते. त्यांच्या परस्परसंबंधात समानता होती. तशीच समानता सरिता वाकलकर-शंकर वाकलकर , उषा दर्डा -जवाहरलाल दर्डा, नंदा मेश्राम-केशव मेश्राम, ज्योत्स्ना कदम-संभाजी कदम, अलका मांडके-नीतू मांडके, कृष्णाबाई सुर्वे-नारायण सुर्वे ,या दाम्पत्याच्या सहजीवनात स्त्री-पुरुष समानतेचे दर्शन घडते. मात्र उर्मिला पवार-हरीश्चंद्र पवार,आशा आपराद-दस्तगीर आपराद,वैशाली हळदणकर-दिलीप हळदणकर,मंदाकिनी जाधव-हर्षद मेहता यांच्या सहजीवनात मात्र संघर्षाचे चित्र प्रकर्षाने दिसून येते.

स्त्रीविषयक वैचारिक जाग येवून त्याबाबत नवविचारांची सुरुवात १९ व्या शतकात झाली होती. स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या सामाजिक रूढी कमी करून स्त्रियांना कायदेशीर अधिकार मिळू लागला होता. घटनेने स्त्रियांना समानता दिली तसेच महत्वाचा मतदानाचा अधिकार

दिला. स्त्रियांना अधिकृत समानतेचा अधिकार मिळाला. त्यानंतर च्या काळात स्त्रीमध्ये असणाऱ्या शैक्षणिक क्षमतेने ती नोकरी करू लागली. मुलीना ही समान संधी देण्याची पालकांची वृत्ती निर्माण होऊ लागली.

मुलांचे संगोपन आर्थिक जबाबदाऱ्या व पत्नीचा त्यातील अधिकार, आजारपणे, आप्तस्वकीय,मित्रपरिवार या सर्वांसंदर्भात दोघांच्याही भूमिका पणाला लागताना दिसतात आणि हे सारे जबाबदारीने सांभाळताना स्त्री-पुरुषात संवाद निर्माण होताना दिसला. या काळातील आत्मकथनात स्त्री-पुरुष सुसंवादाचे सखोल व्यापक व मनोहारी दर्शन घडते.एकविसाव्या शतकात पदार्पण करणारी स्त्री आत्मविश्वासू विचार, विचारी आणि अधिक आग्रही झाली आहे.सर्व क्षेत्रात तिचे यशस्वी पदार्पण झाले आहे.नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण वाढले आहे. अलीकडच्या ह्या आत्मकथनात हा सती-पुरुष सुसंवाद दिसत आहे प्रमाण वाढले आहे हे मान्य करावे लागेल. एकूणच काय तर स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीकोनातून ह्या आत्मकथनात पूर्वीच्या स्त्रियांच्या तुलनेत मोठा बदल झालेला दिसतो. स्त्रीवादाची संकल्पना मूळ धरू लागली. 'स्त्री' या केंद्रबिन्दुभोवती 'स्त्रीवाद' हि संकल्पना विकसित होऊ लागली. स्त्री-जीवनविषयक तत्त्वज्ञान त्यातून निर्माण झाले.स्त्रियांच्या लेखनातून स्त्रीवादी जाणीव निर्माण होऊ लागल्या आणि त्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हंटले जाऊ लागले. १९ व्या शतकात समाजक्रांती करणाऱ्या नेत्यांमुळे स्त्री-पुरुष समानता रुजू लागली.त्याचे पडसाद आज २१ व्या शतकात दिसू लागले. अर्थात सर्वच ठिकाणी समानता आहे अस नाही परंतु पुरुषप्रधान संस्कृतीकडून समतावादी संस्कृतीकडे आपला प्रवास होत आहे. या आत्मकथनांतील स्त्रिया भिन्न संस्कृती, भिन्न कुटुंबातून आलेल्या आहेत. फक्त पतीशी होणारा संघर्ष व्यक्त करतात अस नाही तर त्याने दिलेली प्रेरणा,प्रेम व्यक्त करतात. समानतेला सुरुवात झालेली असली तरी स्त्रियांचे सर्वच प्रश्न सुटले आहेत अस नाही. मात्र आत्मविश्वास वाढलेला आहे. साधना आमटे आणि सरिता वाकलकर त्याच प्रेरणेने काम करताना दिसतात.

समतेकडे प्रवास होतो आहे असे असले तरी नोकरी व कुटुंबाची दुहेरी जाबाबदारी पार पाडताना शारीरिक व मानसिक त्रासांना सामोरे जावे लागत आहे. 'सर आणि मी', 'हृदयस्थ','समिधा','धाकट्या नजरेतून', 'मी नंदा' या आत्मकथनांतून स्त्री पुरुषांचे वैवाहिक, मानसिक व भावनिक जीवन एका उच्च पातळीवर पोहोचलेले दिसते. १९९५ नंतर संगणक युगाची सुरुवात झाली. इलेक्ट्रॉनिक माध्यमे निर्माण झाली. जीवनाची क्षेत्रे रुंदावली. केवळ समानता च नाही तर विषमतेचा विचार करताना संघर्ष लक्षात घ्यावा लागेल. हा संघर्ष कौटुंबिक, व्यावसायिक, शैक्षणिक,सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावर होताना दिसतो. संघर्षाचे स्वरूप बदलताना दिसत आहे. प्रस्तुत काळात स्त्रीजीवनात वेगाने स्थित्यंतर झाले. संघर्षाचे फक्त स्वरूप आणि प्रमाण बदललेले दिसते.स्त्री-भृणहत्या,गर्भजल चाचणी,बलात्कार,खून या अत्याचारांना स्त्रियांना सामोरे जावे लागत आहे. बाह्य स्तरावरील बदल व कायद्याचे संरक्षण हे समाजाच्या मानसिक धारणा नाही बदलवू शकत, त्यामुळे स्त्रियांना अनेक ताण आणि समस्यांना सामोरे जावे लागत आहे. बदलत्या आधुनिक जीवनात एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात परिवर्तनाची सुरुवात होऊन संस्कृतीला एक नवे

वळण मिळत गेलेले दिसते. मॉल्स , मल्टीप्लेक्स संस्कृती आलेली दिसते. सोफ्टवेअर बरोबर कार्पोरेट क्षेत्रात स्त्रिया उतरताना दिसतात. कॉल सेंटर मधून देखील त्या काम करताना दिसत आहेत. घर,मुलं,कुटुंब,नातेसंबंध,घरगुती जबाबदाऱ्या यात ताणतणाव निर्माण होताना दिसतात. स्त्री-पुरुष संघर्ष निर्माण होण्यामागे बदलती जीवनशैली कारणीभूत ठरताना दिसते. हजारो वर्ष घट्ट झालेल्या रूढी-परंपरा चुटकीसरशी बदलत नाही. ज्या वातावरणात व ज्या कारणामुळे स्त्रिया घराबाहेर पडल्या त्या समाजात त्यांच्याकडे पाहण्याचा व त्यांना वागवण्याच्या रितीमध्ये जास्त फरक पडणे शक्य नव्हते. त्यामुळे मिळवत्या असूनही त्या ताबेदार राहून कुटुंबाच्या खस्ता काढीत होत्या. याचा अनुभव आजही नित्याचाच आहे.

संपूर्ण मानवजातीचा इतिहास पाहिला तर स्त्री जातीवरील अन्याय वर्षानुवर्षे चालत आलेला आहे. समाज, संस्कृती आणि लैंगिकता यांच्या धाकाने पुरुषसत्ताकतेने स्त्रीला इतके धाकात ठेवले की, दडपणाखालचे आयुष्य हेच स्त्रीचे नैसर्गिक आयुष्य आहे असे स्त्रियांनाही वाटू लागले. असे असले तरी आधी सांगितल्याप्रमाणे स्त्री जीवनात जो बदल झाला त्यामुळे शिक्षण, विज्ञान व समाजजीवनातल्या बदलाने स्त्रियांना आपल्या पराधीन आयुष्याची जाणीव होत गेली त्यामुळे त्या स्त्री स्वांतत्र्यासाठी समानतेसाठी लढू लागल्या. परंपरेने स्त्री आणि पुरुषांची मानसिकता घडवलेली होती. त्यामुळे स्त्रियांच्या नोकरीने, घराबाहेर पडण्याने स्त्रियांचे ताणतणाव वाढले होते. घर, नोकरी, मुलांचे संगोपन, रीतीरिवाज यात स्त्रियांची कसरत होत होती. एका बाजूला असे म्हणायचे कि स्त्री ही पुरुषाला पूरक आहे आणि वर्तनाचे नियम मात्र परस्परविरोधी यामुळे स्त्रीपुरुष संघर्ष होऊ लागले. २१ व्या शतकातील आत्मकथनात कधी सौम्य तर कधी दाहक असा कौटुंबिक स्तरावरील स्त्री पुरुष संघर्ष निर्माण झाला आहे. या सर्व आत्मकथानांतील स्त्री-पुरुष संघर्ष पतीशीच झालेला दिसतो. लेखिकांनी त्याच संघर्षाला केंद्रीभूत ठेवून वर्णन केलेले आहे. इतरही पुरुषांचा त्रास झाला. कधी वडील,कधी भाऊ,कधी दीर तर कधी सहकारी. मात्र पतीशी होणारा संघर्षच जास्त दाहक वाटला. संपूर्ण आयुष्यच ज्यांच्या सोबत राहयचे त्याच्या व आपल्या मतांतील, विचारांतील,दृष्टीकोनांतील संघर्ष व्यक्त झालेला आहे.हा संघर्ष कधी शाब्दिक आहे तर कधी हिंसात्मक पातळीवर देखील उतरलेला दिसतो. कुटुंबापरत्वे तो बदलताना दिसतो. एकत्र कुटुंब पद्धती होतीच कालानुरूप त्यातही बदल होऊ लागले. व्यक्तिस्वातंत्र्य वाढत जाऊ लागले. एकमेकांसाठीचा त्याग, संयमशिलता,सहनशीलता कमी होऊ लागली. त्यामुळे वैयक्तिक पातळीवर केंद्रीभूत विचार करण्यामुळे कौटुंबिक पातळीवरील संघर्ष वाढलेला दिसतो.

ह्या आत्मकथनातिल स्त्रियांच्या जीवनाबरोबर त्या ज्या कुटुंबात वाढल्या, ज्या गावात, समाजात, जातीत, संस्कृतीत वाढल्या त्यांचेही उल्लेख अपरिहार्यपणे त्यांच्या लेखनात आले आहेत .त्या संदर्भामुळे आपल्यलाला त्या काळाची,समाजाची व संस्कृतीची माहिती मिळते. ज्या सामाजिक परिस्थितीत समाजात आपण जीवन जगलो त्या काळाचे वास्तव दर्शन आत्मकथनातून दिसून येते. म्हणूनच आत्मकथनाना 'सामाजिक दस्तऐवज' म्हटले जाते. बदलत्या समाजाचे, संस्कृतीचे यथार्थ दर्शन घेण्यास आत्मकथनांचा खूप उपयोग होतो. स्त्रिया काळाच्या परिवर्तनाच्या ज्या टप्प्यावर उभ्या होत्या त्या काळाचे चित्रण त्यांच्या साहित्यातून

येते. ख्रिश्चन कुटुंबातील यशोदाबाईंना ब्राम्हण हिंदू कुटुंबात विवाह करून आल्यावर येणारे अनुभव ते नंदा मेश्राम जातीने मराठा असताना वयाने सत्तावीस वर्ष मोठ्या असणाऱ्या दलित असणाऱ्या केशव मेश्रामांशी लग्न केल्यावर आलेले अनुभव तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीचे दर्शन घडवतात. त्यातून त्या काळातील सामाजिक स्थितीचे दर्शन घडतेच आणि स्त्री-पुरुष संघर्षाचेहि दर्शन घडते.

स्त्रीवर होत आलेला पारंपारिक अन्याय या समाजव्यवस्थेने दिलेली देणगी आहे. त्याचे प्रत्यंतर काळाच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला आलेले आहे. महाराष्ट्रातील स्त्री जीवनाचा विचार केला तर अनेक गोष्टी आपल्या लक्षात येतात. बदलत्या समजानुसार स्त्री बदलत गेली. समाजाचा तिच्या व्यक्तिमत्वावर व विचारधारेवर परिणाम होत गेला. स्त्रियांबाबत होणाऱ्या चळवळी चा तिच्या जीवनावर परिणाम होत गेला.स्वातंत्र्यानंतर झालेल्या कायद्यांनी स्त्रियांना संरक्षण आणि आत्मसन्मान मिळाला. या सर्व बदलांचे पडसाद २१ व्या शतकातील लेखनात दिसतात. तसेच या स्त्रियांनी शैक्षणिक व व्यावसायीक स्तरावर देखील संघर्ष केलेला आहे. शिक्षण व व्यवसायाने वरवर सक्षम झालेल्या या स्त्रियांना भिन्न भिन्न क्षेत्रात मात्र वेगवेगळा अनुभव येताना दिसतो. 'बारबाला' मधील वैशाली हळदणकर ला एक उपभोग्य वस्तू म्हणून प्रचंड पिळवणूकीचा सामना करावा लागला. पुरुषी अत्याचार, व्यसनाधीनता, मानसिक व शारीरिक अस्वास्थ्य यांना तोंड द्यावे लागले. 'भोगले जे दुखः त्याला ' ह्या आत्मकथनातील आशा आपराद यांना एकतर स्त्री म्हणून त्यात ती मुस्लीम म्हणून शिक्षण व नोकरीसाठी प्रखर विरोध सहन करावा लागला. पण त्या संघर्षाने त्या यशस्वी झाल्या स्वतःचे सामाजिक स्थान निर्माण करू शकल्या. 'आयदान' मध्ये हरीश्चन्द्राला उर्मिलाच शिकणं मोठी लेखिका होणं त्रासदायक होते. त्याची चिडचिड होते. 'चाकाची खुर्ची' या नसीमा हुरजूक यांच्या आत्मकथनात एका असामान्य असणाऱ्या अपंग स्त्रीचा संघर्ष व मोठेपणा व्यक्त झालेला आहे. 'संग्राम' ह्या आत्मकथनात सीमा साखरे यांच्या सामाजिक जीवनातला संघर्ष व्यक्त झाला आहे. निरक्षर असणाऱ्या किशाला 'मास्तरांची सावली' या आत्मकथनात व्यावसायीक स्तरावरचे अनुभव जीवनसाक्षर करतात. या सर्वच आत्मकथा लेखिकांना जरी व्यावसायीक व शैक्षणिक स्तरावर संघर्ष करावा लागला नाहीच अस नाही तर थोड्याफार फरकाने तो होताच. त्या तत्कालीन स्त्रियांचे प्रतिनिधित्व करतात. नव्या आर्थिक धोरणाने समाजाची आर्थिक व्यवस्था बदलत होती. पण परिवर्तन करणाऱ्या स्त्रीमध्ये पुन्हा एक नवी जाबाबदारी देवू पाहत होती. परंपरेने आलेल्या रूढी, चालीरीतीतून काही प्रमाणात सुटका होत असली तरी आर्थिक पातळीवर मात्र ही स्त्री एका नव्या व्यवस्थेत गुंतताना दिसत होती.

२१ व्या शतकात स्त्री-पुरुष संघर्षाचे स्वरूप बदलले. स्वातंत्र्यानंतरचा बदलता काळ, सामाजिक परिस्थिती, स्त्रीमुक्तीचे पर्व व त्यानुसार बदललेले स्त्रीचे व्यक्तिमत्व व कर्तृत्व यातून स्त्री-पुरुष सहसंबंधांचे बदलते स्वरूप लक्षात येते. नवविचाराने व कायद्याच्या संरक्षणाने स्त्रीजीवनामध्ये बदल होऊ लागले. वैयक्तिक स्तरापासून सामाजिक स्तरापर्यंत बदल झाले. या संक्रमणाच्या काळात काही ताणतणाव आणि संघर्ष हि निर्माण झाले. पतीनिष्ठ परंपरा,रूढी, चालीरीती यांनी पोसली गेलेली स्त्री-पुरुषांची मानसिकता होती, पण हे सारे झुगारून स्त्रियांनी नोकरी स्वीकारली होती. घराबाहेर पडण्याने ताण वाढले. घर, नोकरी,

मुलांचे संगोपन, रीतीरिवाज यात स्त्रियांची तारेवरची कसरत होऊ लागली व इथेच संघर्षाचे एक नवे रूप उदयास आले. मात्र सकारात्मक बदल ही झाले. आजची स्त्री सक्षम झाली , तिचे आत्मभान जागृत आहे. प्रत्येक गोष्ट ती परंपरा म्हणून स्वीकारत नाही तर त्यामागचे कारण जाणून घेते. स्त्री प्रगत व मुक्त झाल्यामुळे कुटुंबसंस्था व समाज बिघडेल हि भीती खोटी ठरली. उलटपक्षी शिक्षणामुळे व व्यवसायामुळे स्त्रिया आत्मविश्वासाने वावरू लागल्या

## समारोप:

ह्या आत्मकथनात प्रत्येक स्त्रीचे क्षेत्र, अनुभव, संस्कृती, विचारसरणी प्रत्येकी हून भिन्न आहे. त्यामुळे प्रत्येकीचे जीवनानुभव वेगवेगळे आहेत. त्यातून स्त्री जीवनाचे विविध स्तर लक्षात येतात. जीवन जगताना आणि भोवती बघताना त्यांचे जे चिंतन आहे त्यातून नव्या जाणिवांचे प्रकटीकरण झाले आहे. जवळजवळ सर्वच क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या या आत्मकथनातील स्त्रियांच्या जीवनानुभवाचा अभ्यास करताना स्त्रीजीवनाचे विविध स्तर व गट लक्षात येतात. जागतिकीकरणाचा जसा स्त्रीजीवनावर सकारात्मक परिणाम झाला तसाच नकारात्मक देखील झाला. स्त्रीदेहाला उपभोग्य वस्तू समजून शो, बार आणि जाहिरातीत वापरले जात आहे. आधुनिक स्त्री म्हणून मानाने मिरवत असणाऱ्या स्त्रीला दुटप्पीपणा ची वागणूक मिळत आहे. पत्नीला गृहीत धरणारा पती, पत्नीचे विचार दुय्यम मानणारा पती, प्रसंगी तिला मारहाण करणारा पती दिसतो तसेच तिला मान देणारा, तिची पूजा करणारा पतीही दिसतो. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर ,२१ व्या शतकात अशा वेगवेगळ्या टप्प्यावर स्त्रियांचे अनुभव वेगवेगळ्या स्तरातून व्यक्त होतात. स्त्रीचे बदलते सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक स्थान आत्मकथनांतून दिसते.

## आधारभूत संदर्भ:

1. अहिरे प्रतिभा, सामाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून स्त्रियांची आत्मकथने, प्रस्तावना, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र.आ.२०११
2. कर्वे स्वाती, (संपा.), स्त्रीविकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्र.आ. २००८ पान-३८२
3. कऱ्हाडे सदा, आत्मचरित्र, प्र.आ. १९७६ पृ.१०१
4. कुलकर्णी वा.ल. वाङ्मयीन टीपा व टिप्पणी, पृ.११३
5. खोले विलास, आत्मचरित्र व चरित्र: एक चिकित्सा ,साहित्यसूची दिवाळी अंक, १९८७ पुणे,पृ.४९
6. गुंडी नीलिमा, स्त्रीमिती-निवडक मिळून साऱ्याजणी, मौज प्रकाशन,मुंबई, प्र.आ. २०१० पृ-२७१
7. जोशी अ.म. , चरित्र आत्मचरित्र, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे, चतुर्थ आवृत्ती, २००७ ,पृ-९४
8. थोरात विलास, एक नवा टप्पा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००७ प्र.आ. पृ-३६

9. धोंगडे आश्विनी, स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन पुणे, प्र.आ.१९९३, पृ-४५
10. पाटील शोभा, स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्र.आ. २००७
11. वरखेडे मंगला, स्त्रियांची नवकथा वाट आणि वळणे, कैलासराणा प्रकाशन, नाशिक, १९९६, प्रस्तावना
12. प्रस्तुत काळातील सर्व आत्मकथने

ISBN: 978-93-90847-35-8

# 2. मराठी साहित्याच्या इतिहासातील एक लक्षवेधक पान - डॉ. आ. ह. साळुंखे


## डॉ. सुलभा उल्हास पाटील

सहयोगी प्राध्यापक,
गोखले एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
संगमनेर.


### 2.1 पार्श्वभूमी:

अगदी प्रारंभीच्या प्राचीन कालापासून ते आजपर्यंतच्या मराठी साहित्य इतिहासात डोकावून पाहिले तर अनेक साहित्यिक व साहित्यिक कृती यांचे वैविध्य दिसून येते.विविध विचारधारा, शैली, भाषा, बोली, आकृतिबंध यांत खूपच विविधता आहे. त्यांत संत नामदेव,जगद्गुरू संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर इत्यादीपासून ते कुसुमाग्रजांपर्यंत अनेकानेक दिग्गज तळपतांना दिसतात. मराठी साहित्यात अनेक वाद- जसे मार्क्सवाद, आबेडकरवाद .....याप्रमाणे.तसेच अनेक मूल्ये,साहित्यिक मूल्ये इत्यादी संदर्भात अनेक गट व मतमतांतरे दिसतात. प्रस्तुत लेखात असा कोणताही हेतू नाही. खरोखर "मराठी साहित्याचा इतिहास-१८१८-२०१०" या कालावधीतील एक ठळक संवेदनशील तसेच सृजनशील तसेच जीवनाभिमुख साहित्य व साहित्यिक म्हणून डॉ.आ.ह.साळुंखे यांचा परिचय व्हावा म्हणून हा लेख !

साहित्य निर्मिती ही अनेक कारणांनी वा हेतूंनी होत असते. क्वचित ती सहजपणे वा निर्हेतूकपणे सुद्धा होत असते. मनोरंजन, सौंदर्यात्मक अभिरुचीची जोपासना, प्रबोधन, भूतकालीन घटनांची जपवणूक. अशा कितीतरी गोष्टी.हा एक साधासुधा मागोवा झाला. पण नेहमी ते इतके सरळच असते, वा सर्वांना सुगम, आकलन होण्याइतके साधे असते असे नाही.खूप लांब न जाता जवळचीच, महाराष्ट्रातीलच उदाहरणे पाहता येतील –

मानव उत्क्रांतीच्या आदिम काळात "पंचमहाभूते" यांच्याबद्दल जनसामान्यांना या पंचमहाभूतांच्या कार्यामागील कार्यकारणभाव माहीत नसल्याने त्यांना अद्भूत शक्ती वा देव मानले जाऊ लागले, त्यासाठी मंत्र, प्रार्थना....इत्यादींची निर्मिती होता होता अनेक गोष्टी निर्माण होत होत मग ....चातुवर्ण्य, उपासना, पुरोहितशाही इत्यादी अशा अनेक गोष्टींची उतरंड तयार झाली. शिक्षण व ज्ञान याचे मक्तेदार निर्माण झाले.व शोषण व अन्यायाचा इतिहास घडत गेला.

इतिहासातील छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज वेगळ्याच रीतीने लोकांसमोर आणले गेले.... "साहित्य नराचा नारायण करते, तसेच ते नराला राक्षस ही बनवते!"

महात्मा गांधींचा खून करुन,खून करणारांचे समर्थन करणारे सुद्धा साहित्यच! साहित्याची ही विलक्षण ताकदच जाणून कूट तार्किक बुद्धीचा वापर करुन कल्पनेला साहित्यात व त्या

अनुषंगाने जनसामान्यांच्या जीवनात पेरून वर्णव्यवस्था रुजवणारे शेकडो शतके लोकांना वेठीस धरुन सुखोपभोग घेत राहतात, कारण जनसामान्यांची अशी श्रद्धा असते की, "साहित्यात समाजाचे प्रतिबिंब असते, आणि म्हणून थोरा मोठ्यांनी लिहून ठेवलेल्या गोष्टी खऱ्याच असतात!" असे जर खरोखरीच असते तर मग प्रश्नच नव्हता, पण त्यामागे कधी कधी केवढे काळे सत्य असते !! याची प्रचिती तर या सगंणक व तंत्रज्ञान युगातही आपल्याला येते आहे. मूळ मुद्द्यावर येण्यासाठी प्रस्तुत उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत. तर मराठी साहित्याच्या इतिहासाच्या या पार्श्वभूमीवर डॉ. आ. ह. साळुंखे सरांचे साहित्य म्हणजे या सर्व बाबींवर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकणारे एक लक्षवेधी पान आहे, कारण ते अखिल मानव जातीला अज्ञानाच्या अंधारातून प्रकाशाकडे नेणारे साधक आहेत! "सत्याला सत्य म्हणून आणि असत्याला असत्य म्हणून जाणा," हा बुद्धविचार पुढे नेणारे एक सत्यसर्जक आहेत. अर्थात म्हणून सर्व साहित्य वा साहित्यिक असे नसतात. ही एक बाजू झाली, पण ती दुर्लक्षून चालणार नाही.शोषण विरहीत समाज निर्माण करायचा असेल तर जबाबदार साहित्य व साहित्यिक तयार होणे महत्वाचे जितके आहे तितकेच विकृतीकरण करुन लिहिलेले साहित्य खऱ्या स्वरुपात समाजापुढे आणणे हे तेवढेच महत्वाचे व धैर्याचे काम आहे. वैचारिक शोषणातून मुक्ती होणे ही खरी आजच्या समाजाची गरज आहे.पण अनेकदा तसे होतांना दिसत नाही. "बुडत्याचे पाय डोहाकडे", या उक्तिप्रमाणे अनेक तर्क-कुतर्क यांचा आधार घेऊन समाजाला परत परत त्याच शोषणाच्या भूलभूलैयात आणून सोडतात.आणि यासाठी परत ग्रंथ प्रामाण्याचाच आधार घेतला जातो. कारण जनसामान्य लोकांना, समाजाला संस्कृत भाषेचे ज्ञानही नसते व तेवढा वेळही नसतो. अशावेळी गरज असते, कोणीतरी प्रकाशाचा मार्ग केवळ दाखविण्याचीच नाहीतर त्या वाटेवर घेऊन चालण्याची. नेमके हेच ओळखून डॉ.आ.ह.साळुंखेनी आपल्या साहित्यातून समाजाला वेगळी वैचारिक दिशा देण्याचे काम केले आहे व करत आहेत. साहित्यकृती ही केवळ साहित्यिक नसते तर तिला सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक असे अनेक संदर्भ असतात.अनेकदा हे संदर्भ रुढ, प्रस्थापित धारणा, परिस्थिती इत्यादींशी निगडित असतात. त्यांचा योग्य अन्वयार्थ लावून सत्याचे आकलन करुन घेणे हे महत्वाचे असते.ते तसे झाले नाहीतर परिस्थिती बदलत तर नाहीच,पण ती अधिकाधिक दृढ होत जाते.आणि हेच आतापर्यंत होत आले आहे. याला बदलण्याचा प्रयत्न ज्यांनी ज्यांनी केला त्यांतील अनेकांना जीवही गमवावा लागला....व आजही या परिस्थितीत बदल झालेला नाही.पण समाजहित लक्षात घेऊन लेखन करणारे अनेक साहित्यिक आहेत. त्यातीलच एक ठळक व लक्षवेधी नाव म्हणजे डॉ.आ.ह.साळुंखे.यांच्या साहित्याची व त्यांची एक साहित्यिक म्हणून ओळख करून घेणार आहोतच, पण त्यापूर्वी त्यांचा एक व्यक्ती म्हणून परिचय पाहुया-

सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील खाडेवाडी [शिवाजीनगर]येथे त्यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात झाला.त्यांचे संपूर्ण नाव-आण्णासाहेब हरी साळुंखे. पाचवी पासून ते अकरावीपर्यंतचे शिक्षण तासगाव येथे झाले. नंतर सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयातून ते संस्कृत विषय घेऊन,तत्वज्ञान व हिंदी विषयांसह बी.ए. व एम. ए. झाले. सातारा येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात ते संस्कृत विषयाचे विभाग प्रमुख आणि कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे विद्याशाखेचे अधिष्ठाता व ॲकॅडेमिक कौन्सिलचे सदस्य होते.त्यांना राष्ट्रभाषा पंडित म्हणून गौरविण्यात आले होते. डॉ.आ.ह.साळुंखे यांनी मराठी विश्वकोशात

तुलनात्मक धर्मशास्त्र,संस्कृत इत्यादी विषयात १०० हून अधिक लेख लिहिले आहेत.१९५९ पासून जाहीररीत्या सभांमधून व्याख्याने देत आहेत. याच सुमारास डॉ.आ.ह.साळुंखे यांनी चार्वाकवर लिहिलेली लेखमाला वाईच्या नवभारत मासिकात प्रकाशित झाली.तर दुसरीकडे किर्लोस्कर मासिकाच्या जून १९८१च्या अंकात मराठा समाजावरील आत्मनिरीक्षणात्मक स्वरूपाचा लेख प्रकाशित होऊन गाजला.त्यावर फक्त प्रतिक्रिया म्हणून किर्लोस्कर मासिकाकडे तीन पोती भरतील एवढी पत्रे आली होती. ०४ ऑगस्ट २००९ ला महाराष्ट्र सरकारने डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली राज्याचे सांस्कृतिक धोरण ठरविण्यासाठी समिती नेमली होती.या समितीत डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या खेरीज वि.वि.करमरकर, शफाअत खान, आमदार उल्हास पवार, डॉ. अरुण टिकेकर, अशोक नायगावकर, गिरीश गांधी,प्रा.दत्ता भगत, प्रा.डॉ. सिसिलिया कार्व्हालो हे सदस्य होते. या २०१० रोजी संमत झालेल्या मसुद्याच्या अंमलबजावणीसाठी डॉ.आ.ह.साळुंखे यांची नेमणूक करण्यात आली होती. हा डॉ.आ.ह.साळुंखे यांचा अल्प औपचारिक परिचय झाला. एक साहित्यिक म्हणून ते उत्तरोतर विकसित होत गेले हे तर पाहूच,पण सुरुवातीलाच त्यांना प्राप्त झालेल्या पुरस्कारांची व मान सन्मानांची यादीच बरेच काही सांगून जाते –

1. ०७ फेब्रुवारी १९९९ रोजी बाबुराव बागुल यांच्या संमेलनाध्यक्षपदी मुंबईत धारावी येथे झालेल्या पहिल्या विद्रोही साहित्य संमेलनाचे उद्घाटक.
2. रा.न.चव्हाण प्रतिष्ठान [वाई] चा महर्षी वि.रा. शिंदे पुरस्कार- १९९९.
3. जळगाव येथील परिवर्तन साहित्य संमेलनाचे उद्घाटक – १९९९
4. बेळगाव येथील विचारवेध साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद – १९९९
5. अमरावती येथील पहिल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष – २०००
6. छत्रपती प्रतापसिंहराजे महाराज [थोरले] स्मृतीप्रित्यर्थ सातारा नगरपालिकेचा पुरस्कार.- २०१०
7. प्रबोधनकार ठाकरे पुरस्कार – २०११
8. केज येथील पहिल्या बौद्ध साहित्य संमेलनाचे अध्यक्ष- २०१२
9. पुणे महापालिका आयोजित पहिल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्य संमेलनाचे अध्यक्ष- २०१३
10. पुणे येथील तिसऱ्या अण्णा भाऊ साठे पहिल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष-२०१३
11. रहिमतपूर पंचक्रोशी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष-२०१५
12. महाराष्ट्र शासनाचा दोनदा डॉ. आंबेडकर पुरस्कार.
13. सामाजिक कृतज्ञता निधीचा डॉ. राम आपटे पुरस्कार.
14. तीन वेळा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार.
15. अमेरिकेतील महाराष्ट्र फौंडेशनचा साहित्य पुरस्कार.
16. महाकवी अश्वघोष जीवन गौरव पुरस्कार -२०१६
17. बीड येथील पिंगळे वाचनालयाचा महात्मा फुले पुरस्कार.

डॉ. आ.ह.साळुंखे यांना प्राप्त पुरस्कार व सन्मानांची ही थोडक्यात यादी आहे.प्रत्यक्षात ती आणखी मोठी आहे. यावरूनच त्यांची साहित्यिक ही ओळख खूप काही सांगून जाते.

डॉ. आ.ह.साळुंखे लिखित पुस्तकांची यादी सुद्धा अशीच विस्तृत आहे, जी विवेचनाच्या ओघात येणारच आहे. तरीही वानगी दाखल महत्वाची पुस्तके पुढील प्रमाणे –
मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती
विद्रोही तुकाराम
हिंदू संस्कृती आणि स्त्री
महाभारतातील स्त्रियां - एकूण तीन भाग.
जिज्ञासा पुरुष ह्यूएनत्संग
ना गुलाम, ना उद्दाम !
वादांची वादळे
वैदिक धर्मसूत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी.
बळीवंश
ऐतरेय ब्राम्हण : एक चिकित्सा
गुलामांचा व गुलाम करणाऱ्यांचा धर्म एक नसतो.
'अंधाराचे बुरुज ढासळतील.'
'आता आमच्या धडावर आमचेच डोके असेल.'

यानुसार त्याची विविध व संपन्न अशी ग्रंथसंपदा आहे

## डॉ.आ.ह.साळुंखे यांचे साहित्यिक म्हणून वेगळेपण -

डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या लेखनातून त्यांची ओळख विचारवंत अशी झाल्यास नवल वाटायला नको.ललित लेखक व त्याचे साहित्य हे सामान्य व्यक्तिंनाच नव्हे तर खुद्द स्वत: लेखकालाच मोहात पाडत असते. एक कालखंड असा होता की, बंगाली साहित्य व शरतचंद्र चटर्जी, रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्याने लाखो लोकांना भुरळ घातली होती, कारण त्यांच्या लेखणीची जादूच तशी होती. त्यातही ज्यांना बंगाली भाषा येते,व ज्यांनी त्या भाषेचा मृदु,मुलायम स्पर्श व रसगुल्ल्याचा रसाळपणा अनुभवला आहे, ते त्या भाषेच्या व ललित लेखनाच्या मोहातून सहजी बाहेर पडू शकत नाहीत.त्यात भ्रमंती सारखा छंद असेल तर विचारायलाच नको. डॉ.आ.ह.साळुंखे यांचा सुरुवातीचा कालखंड असाच हिंदी, बंगाली, संस्कृत साहित्याने, काव्य लेखनाने भारावलेला होता. सृजन हा खऱ्या साहित्यिकाचा स्वभाव असतो.आणि संवेदनशील मन हे त्याच्या सृजनाचा उगम व स्त्रोत असते.केवळ सौंदर्य त्याला मोहात पाडू शकत नाही, तर न्याय व नैतिकता यांसारखी मूल्ये त्याला सतत जमिनीवर घेऊन येतात. आणि म्हणूनच एकदा चार्वाकाच्या विचारांशी ओळख झाल्यानंतर त्यांच्यातील कार्यकर्त्याने सभोवतालची परिस्थिती अचूक टिपली,त्यातील सांस्कृतिक- सामाजिक संघर्ष व त्याची कारणं शोधली.बहुजन समाजातल्या तरुण पिढीमध्ये आत्मभान निर्माण करण्याचे कार्य करण्याचा निर्णय आ.ह.च्या संवेदनशील व विवेकशील मनाने घेतला. "युगायुगांपासून बहुजन

समाजमनावर पेरली गेलेली अज्ञान,अंधकार,शोषण,वंचना,यांची बीजेच जेथे पेरलेली होती,त्या विषारी तणांची पूर्णतः मशागत करून हे आत्मभान निर्माण करणारे बीज पेरणे म्हणजे एका अव्वल सृजकाचेच काम होय." साहित्य क्षेत्रातील डॉ.आ.ह.साळुंखे हे हाडाचे शेतकरी होते,या देशाची माती सुपिकच आहे, पण तेथे गरज आहे ती काय पेरावे,याचे सामाजिक व सांस्कृतिक भान असण्याची,हे त्यांच्या संवेदनशील मनाने अचूक टिपले

आर्यांनी येथील प्राचीन भारतीय लोक व त्यांची संस्कृती यांचे विकृतीकरण कसे केले आहे हे त्यांच्यातील कार्यकर्त्या व अभ्यासक मनाने अचूक टिपले.हे विषारी तण निपटून काढणे हेच मूलभूत व अत्यंत जोखमीचे व जिकिरीचे तसेच नाजूक काम होते,तेथे जातिवंत, कुशल असा शल्यगारच हवा होता.यासाठी त्यांनी संपूर्ण प्राचीन इतिहासाचा अभ्यास केला.संस्कृत, पाली व प्राचीन भाषांमधील साहित्याचे अध्ययन करून येथील बहुजन समाजाचे मूळ स्वरूप शोधून काढले.

बहुजन समाजाच्या अवनतीस कारणीभूत ठरलेल्या वैदिक संस्कृती, पुरोहितशाही मनुस्मृती यांची कूट नीती, कारस्थाने या ग्रंथांच्या अभ्यासातून उघडी पाडली.

भारतातील सांस्कृतिक संघर्षाचे स्वरुप कशा प्रकारचे आहे यावर सखोल संशोधन केले.

पुराकथांमधून प्राचीन भारतीय समाजाचे चित्रण कसे केले आहे,व त्याचे सोयीस्करपणे विकृतीकरण कसे करण्यात आले आहे याचा सूक्ष्म अभ्यास करुन तपशीलवार, संगतवार व मुख्य म्हणजे साधार निरीक्षणे नोंदवून इतिहासाच्या पुनर्मांडणीकरता पुराणकथांचे विवेचन कसे आवश्यक आहे हे स्पष्ट केले, इतकेच नव्हे तर ते अतिशय कष्टाचे, जोखमीचे व सत्यशोधनाचे काम पण अगदीच अलवारपणे केले.ते सत्य शोधणे जेवढे कठीण होते तेवढेच त्याची मांडणी नेमकी, सुसंगतपणे व सत्य व न्याय यांना बरोबर घेऊनच करायची आहे हे भान त्यांनी कधीही सुटू दिले नाही. त्याच्यातील ललित लेखकाने भाषेचा तोल व आब अचूकपणे सांभाळला!

येथील मूलनिवासी भूमिपुत्रांना खलनायकी कसे ठरवले गेले हे पुराव्यांसह शोधून काढले. यासाठी त्यांचे 'बळीवंश' हे पुस्तक विशेष महत्वाचे ठरले आहे.पुराकथा लोकमानसांच्या भोळसटपणाला कशा खतपाणी घालत असतात व त्यातून त्यांची स्वत:च्याच हाताने स्वत:च्याच पायावर कुऱ्हाड मारुन घेण्याची मानसिकता कशी निर्माण केली जाते व हे इतक्या बेमालूमपणे केले जाते की, त्यातील लबाडी संस्कृती व धर्म यांच्या आवरणाखाली त्यांच्या लक्षातही येऊ दिली जात नाही. नेमके हेच मर्म डॉ.आ.ह.साळुंखे यांनी आपल्या अथक अभ्यासातून शोधून काढून जनसामान्यांना जागृत करून त्यांच्यात आत्मभान निर्माण करण्याचे कार्य कुशलतेने केले आहे. 'डॉ.आ.ह.साळुंखे: साहित्य आणि विचार', या आपल्या पुस्तकात प्रा.डॉ. अशोक राणा म्हणतात, "डॉ.आ.ह.साळुंखे यांनी शेषनागाच्या वर्णनावरुन तो शेतकऱ्यांचा आदर्श नेता म्हणून, कसा असावा याविषयी आपले मत मांडले. त्याचप्रमाणे शिल्लक राहिलेले शुद्र लोक असा त्यांनी शेष या शब्दाचा सांगितलेला अर्थ ऐतिहासिक दृष्ट्या

अधिक समर्पक वाटतो. 'पृथ्वी नागाच्या फण्यावर आधारली आहे' या लोकधारणेला आज अद्‌भुताचे आवरण प्राप्त झाले आहे. भूकंप झाला की, शेष नागाने कड फिरविली असे म्हणणारे महाभाग आपण अवती भवती पाहतो.त्यांच्या या भोळसटपणाला तसेच पारंपारिक हिंदू मानसिकतेत रुजलेल्या शेषाविषयीच्या धारणेला तार्किकदृष्ट्या तपासून पाहण्याची सवय डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या वरील प्रतिपाद्राने [डॉ.आ.ह.साळुंखे लिखित बळीवंश या पुस्तकातील वर्णन] लागेल अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

आपल्या संपूर्ण अभ्यासाच्या निरीक्षणातून डॉ.आ.ह.साळुंखे यांनी येथील रुढ,प्रस्थापित व लबाड व्यवस्थेचे मर्म अचूक हेरले की, "या व्यवस्थे विरुद्ध जनसामान्यांनी विद्रोह व बंड करु नये म्हणून अशा विरोधकांना नास्तिक ठरवले." विरोधकांचे मानसिक खच्चीकरण करण्याची ही कूटनीती होती. जनसामान्य बहुजन समाजावर ईश्वर या संकल्पनेचा असलेला पगडा ओळखून वैदिक संस्कृती रक्षकांनी लबाडीने 'नास्तिक' या संकल्पनेचा वापर करुन, यज्ञ, वेदप्रामाण्य,व चातुर्वर्ण्यं या संस्थांना विरोध करणारांना नास्तिक असे संबोधून त्यांचे मानसिक खच्चीकरण करण्याचा धूर्त डाव ते खेळलेले आहेत हे वारंवार आपल्या लेखनातून स्पष्ट केले आहे.

याच अनुषंगाने स्वर्ग, ईश्वर, देवता,अदृष्ट शक्ती या संकल्पना कशा निर्रर्थक असून त्या यज्ञ संस्थेला कशा पूरक आहेत हे वेळोवेळी लक्षात आणून दिले आहे.आणि या गोष्टींचे निर्विवाद महत्व हे आहे की, बहुजनांच्या परिवर्तनवादी चळवळींना एक वैचारिक व मानसिक बैठक प्राप्त होऊन परिवर्तन करण्याची एक निश्चित दिशा संगठनासाठी प्राप्त झाली आहे हे खूपच मोलाचे व महत्वाचे आहे. आणि म्हणूनच डॉ.आ.ह.साळुंखे यांना "महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणाचे शिल्पकार" म्हटले जाते ते किती सार्थ आहे हे लक्षात येते.

डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या अभ्यासाचे आणखी एक विशेष म्हणजे- त्यांनी प्राचीन संस्कृती व बहुजनांची संस्कृती या संकल्पना स्पष्ट केल्या.त्यांचा शोषणमुक्त समाजाला पूरक अशा संकल्पना स्पष्ट केल्या.या दोन संस्कृतींचे खरे स्वरुप, त्यातील विरोधाभास स्पष्ट केले.येथे प्रस्थापित केलेले मूळ "विषारी तण" हे होते की, "वैदिक संस्कृती हीच भारतातील प्राचीन संस्कृती असून तीच सर्वश्रेष्ठ संस्कृती आहे." हे तण मूळातून निपटून काढतांना डॉ.आ.ह.साळुंखे यांनी प्राचीन संस्कृतीच्या अभ्यासकांनी भारतातील प्राचीन समाजाच्या मूळाशी कश्यप या पुरुषाचे कर्तुत्व असल्याचे दिलेले पुराकथीय संदर्भ नाकारलेले आहेत.

त्यामुळे मूळात असत्याचा असलेला डोलाराच कोसळून पडण्यास डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या लेखनाने महत्वाची मदत झाली आहे. 'डॉ.आ.ह.साळुंखे: साहित्य आणि विचार', या आपल्या पुस्तकात प्रा.डॉ. अशोक राणा म्हणतात, डॉ.आ.ह.साळुंखे यांनी असूर, राक्षस हे येथील मूलनिवासी असून त्यांच्या नेत्यांच्या कडूनच त्यांचे पारिपत्य झाल्याच्या कथा वैदिक साहित्यात कशा रचल्या आहेत,यावर त्यांनी प्रकाश टाकलेला आहे.२१ असूर हे उत्तम कृषक असल्याचे२२ त्यांनी ब्राम्हण ग्रंथांच्या आधारे पटवून दिलेले आहे.

"वैदिक संस्कृतीपेक्षा इथल्या भूमीशी खरी नाळ असलेली बहुजनांची संस्कृती ही सत्यावर अधिष्ठित होती, हे यातून व्यक्त होते."

केवळ प्राचीनच नाही तर वर्तमान इतिहासातील घटनांनाही न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.' एकलव्य, शंबूक आणि झलकारीबाई' या पुस्तकात त्याची प्रचिती येते.

थोडक्यात जेथे जेथे अन्याय, शोषण यांची पाळेमुळे त्यांना दिसली त्यांचे निर्मूलन करण्याचे न्यायी व विवेकवादी प्रयत्न डॉ.आ.ह.साळुंखे यांनी केलेले आहेत.याचे प्रत्यंतर त्यांच्या पुस्तकांची नावे जरी पाहिली तरी लक्षात येते. जसे- 'गुलामांचा व गुलाम करणाऱ्यांचा धर्म एक नसतो.' 'ना गुलाम ना उद्दाम.' 'अंधाराचे बुरुज ढासळतील.' 'आता आमच्या धडावर आमचेच डोके असेल.' 'वैदिक धर्मसूत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी.' 'ऐतरेय ब्राम्हण: एक चिकित्सा.'......अशी अनेकानेक पुस्तकांची निर्मिती करुन "धर्मग्रंथांची चिकित्सा केलीच पाहिजे ही नवी दृष्टी बहुजनांना देऊन प्रकाशाची दारे उघडी करुन दिली.

## डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या साहित्याची कलात्मक बाजू /कलापक्ष

डॉ.आ.ह.साळुंखे यांनी केवळ वैचारिक लेखन केले असे नाही तर मूळात ते संवेदनशील, प्रगल्भ व वृत्तीच सर्जक असलेले लेखक आहेत.त्यांच्या लेखनाची सुरुवातच काव्य लेखनातून झाली.वैचारिक प्रगल्भते बरोबरच भावनांची तरलता जोडीला मानवता यांचा सहजसुंदर मेळ दिसून येतो.अत्यंत महत्वाचे विचार साधार स्पष्ट करतांना कोणताही अभिनिवेश, आक्रमकता नसते. सत्य, सुव्यवस्थित मांडणी, सुस्पस्ष्टता, अचूक शब्द निवड हीच त्यांच्या लेखनाची सौंदर्यात्मक बाजू आहे.

**1. भाषेच्या साधेपणातही सौंदर्य:** 'परिवर्तनातून शोषणमुक्त समाज' याचा ध्यास त्यांच्या लेखनात जागोजागी दिसतो. 'परिवर्तन: शास्त्रही, कलाही' या आपल्या पुस्तकाच्या मनोगतात ते व्यक्त होतात – "जीवनावरच उत्कट प्रेम, सृष्टीविषयीची अखंड जिज्ञासा, नव्या अनुभवांसाठीची आतुर उत्कंठा जोपर्यंत क्षीण वा नष्ट होत नाही, तोपर्यंत आपल्या अस्तित्वाचं पात्र सदैव माधुर्यानं ओथंबलेलंच असतं- आपल्या अस्तित्वातून जीवनाचा प्रवाह अखंड वाहतच असतो.आपल्या आतले आनंदाचे झरे कधी आटणार नाहीत, याची खबरदारी मात्र घ्यायला हवी ! शेवटचा श्वासही नवनिर्मितीच्या ध्यासानं झपाटलेला असावा, हे आयुष्याच्या अंताविषयीचं अतिशय कोवळं आणि सुंदर स्वप्न होय ! हे स्वप्न आपण आपल्या हळुवारपणानं जरूर जपायला हवं – कायमचं जपायला हवं !" अतिशय संवेदनशील, तरल अशा शब्दांत व्यक्त होतांना – जीवनाची आनंददायी लय, आश्वासकता व सृजनाची उर्मी शब्दांशब्दांतून एखाद्या शांत वाहणाऱ्या निर्झराप्रमाणे वाह्तांना दिसते,ज्यात उत्फुल्लपणे जगण्याच्या उर्मींचे प्रतिबिंब पडले आहे.

**2. कणखर, आश्वासक विचार मृदुमुलायम सुंदर हळुवार शब्दांतून: सौंदर्यवृद्धी, मनोरंजन हे** डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या साहित्य निर्मितीचे ध्येय नाहीच आहे. वैचारिक परिवर्तन,

शोषणमुक्त आनंदी समाज आणि सत्यशोधन हे त्यांच्यातील कार्यकर्त्याने जाणीवपूर्वक निवडलेले ध्येय आहे. त्यासाठी निर्धारपूर्वक ललित लेखन बाजूला सारुन वैचारिक लेखनाचा मार्ग निवडलेला आहे. त्यामुळे सातत्याने आपल्या लेखणीतून काहीतरी सत्य, तथ्य,व नवीन दिशेने विचारांची मांडणी करणे अशा पद्धतीने लेखन होत असतांनाही विचार व भाषेचा अभिनिवेश, आक्रमकता जी अशा प्रकारच्या लेखनात अपरिहार्य ठरावी ती तर कोठे दिसत नाहीच पण खऱ्या नेतृत्वात जी दूरदृष्टी हवी, त्यानुसारच "तोडण्यापेक्षा जोडण्याची भाषा" अतिशय विचारपूर्वक, संयमाने त्यांनी वापरली आहे.यामध्ये त्यांच्या विचारांची निर्मळता, तळमळ इतकी ओतप्रोत भरलेली असते की, शब्द त्यांना निवडावे लागत नसावेतच, तर जीवंत झऱ्याप्रमाणे आपोआप स्फुरत असावेत....सुंदर, सुबक नक्षीच्या इंद्रधनु रंगांच्या पात्रातून जीवनरसाने भरलेले पेय असावे त्याप्रमाणे ते फुलपाखरासारखे विहरत येतात – जसे- 'परिवर्तन: शास्त्रही, कलाही' या आपल्या पुस्तकात विचार, तर्क व्यक्त करतांना ते किती हळुवार असावेत हे स्पष्ट करतांना ते लिहितात – " काटेरी तर्क चुकीच्या ठिकाणी, चुकीच्या वेळी आणि चुकीच्या पद्धतीनं वापरले तर ते तुमच्या हृद्यांत निरागस फूलपाखरांना जगूच देणार नाहीत आणि इतरांच्या हृदयातल्या निष्पाप, नाजूक, नितांत सुंदर फूलपाखरांनाही मारून टाकणार ! आणि आपण हृदयातली फूलपाखरचं अशी गमावली, तर आपल्या काळजांत नुसते सुरवंटच उरतील ना ! नाही, असं होऊ द्यायचं नाही. आपण फूलपाखरं जपायचीच !" सामाजिक भान व परिवर्तनाची कास धरलेला प्रतिभावंतच असे लेखन करू शकतो, जो खरा कलावंतही आहे. या सौंदर्यात्मक पाऊलखुणा इतर पुस्तकांतही जागोजागी दिसून येतात.

**लेखनातली विविधता -** वैचारिक लेखक अशी जरी त्यांची ओळख असली तरी, अनुवाद, प्रवास वर्णने, चिंतनात्मक लेखन, संवादात्मक लेखन, ललित लेखन, कविता, संशोधनात्मक लेखन तर आहेच पण वरील प्रकार सुद्धा नितांत सुंदरतेने साकारले आहेत. केवळ त्यांच्या पुस्तकांच्या नावांतून सुद्धा याची प्रचिती येते - चांदण्यात भिजायचं राहून जाऊ नये, म्हणून ! जीवनाची लय वेदनेत, अशी भेटत रहा तू, वादांची वादळे, तुझ्यासह आणि तुझ्याविना, चिंतन - बळीराजा ते रवींद्रनाथ ...... केवळ विचारवंत नाही तर, एक प्रियकर, पती, लेखक, कवी, तत्वज्ञ, समाजसुधारक, इतिहासतज्ञ, .....सृजनाचे विविध विभ्रम त्यांच्या लेखणीतून चितारले गेले आहेत. साधा शेतकरी ते कलेला पडलेले सुंदर स्वप्न म्हणजे साक्षात गुरुदेव रवींद्रनाथ टागोर असा त्यांच्या चिंतनाचा विषय म्हणजे तर व्यवहार आणि सौंदर्य यांचा प्रीतीसंगमच ! परिवर्तन किती मूळापासून असावे?यादृष्टीने - "तोपर्यंत रुबाब मिरवून घे !" ही त्यांची रूपककथा तर अप्रतिम !! चिंतन किती जीवनदायी, प्रवाही व भविष्याचा वेध घेणारे असावे त्याची ही सर्वोत्तम झलक आहे!!!

आ.ह.चे अवघे साहित्य म्हणजे एक सृजनगाथाच आहे. 'तुझ्यासह आणि तुझ्याविना हे एक पुस्तक जरी वाचले तरी त्यांचा कलाआविष्कार,संवेदनांची स्पंदनं पानोपानी जाणवत राहतात. ते एक विरही अश्रुंचे महाकाव्यच आहे! भासाचं स्वप्नवासवदत्त हे नाटक, कालिदासाचं मेघदूत, भवभूतीचं उत्तमरामचरित यांतील विरही पात्र, कथानक यांच्या साक्षीने ते आपल्या प्रिय पत्नीच्या चिरवीरहाची, आठवणींची वीणा जेंव्हा छेडतात.......ते केवळ आ.ह.चे विरहगीत

राहिलेच नाही, ते विश्वव्यापी अश्रुंचे महाकाव्यच झाले आहे. बासरीतून अलवार, भावविभोर पण व्याकुळ स्वर मनाला छेडून जावेत, सर्व चराचर व्याकुळ्तेच्या तरंगांनी भारून जावे तसे पानोपानी, शब्दोशब्दी सुंदर पण भावव्याकुळ शब्द, श्लोक, काव्यपंक्ती .. व वाचकाचे अश्रूंनी भरून आलेले डोळे. या आठवणी फक्त विरहमोती बनून बरसत नाहीत तर निसर्गदृश्य, जीवन प्रसंग, या छोट्या छोट्या गोष्टींतून आ.ह.चा एकूणच चरित्रपट कसा असेल याची झलकच देऊन जातात.या छोट्या पुस्तकात त्यांच्या प्रतिभेचा सर्व सृजनवृक्ष बहरून आला आहे.खरे म्हणजे आणखी खूप काही, पण अगदी अल्प शब्दांत- हे पुस्तक म्हणजे काव्याचं महाकाव्य झाले आहे. मृत्यूलाही लाजविणारा या पुस्तकाचा शेवट- स्वत:च स्वत:ला आत्मनिर्भर करणारा, दु:खाचीच संजीवन समाधी घेणारा पण हार न मानणारा – "आता जो क्षण माझ्या शेवटच्या श्वासाचा असेल, तोच क्षण मी तुझा अखेरचा निरोप घेण्याचाही असेल ........तुझ्याविना असूनही तुझ्यासहच असेन ! - तुझ्याविना असूनही तुझ्यासहच असेन !! - तुझ्यासहच असेन !!!

खरे म्हणजे प्रत्येक पुस्तका बद्दलच काहीना काही असे विशेष लिहिण्यासारखे आहेच. पण विस्तारभयाने एक झलक या मुद्द्याच्या अनुषंगाने दिली आहे.

**3. आ.ह.च्या साहित्यातील तत्वज्ञान:** खरे म्हणजे वैचारिक लेखनाकडे ते चार्वाक विचार जनसामान्यांच्या पर्यंत पोहोचावेत म्हणून वळले.पुराकथा व पुरातत्वशास्त्रीय संशोधन यांच्या सखोल अभ्यासातून भारताचा प्राचीन इतिहास व संस्कृतीवर प्रकाश पाडला आहे.संस्कृत साहित्याच्या अभ्यासकांमध्ये राहुल सांकृतायन, देवीप्रसाद चट्टोपाध्याय, कॉ.शरद पाटील इत्यादीं प्रमाणेच डॉ.आ.ह. साळुंखे हे प्राच्यविद्यासंशोधक आहेत.व भाषेचे प्रासादिक व ललित शैली हे त्यांच्या लेखनाचे विशेष वैशिष्ट्य आहे. आपल्या विचारांत त्यांनी 'बहुजन हिताय' हा बुद्धाचा विचार पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याअ धार्मिक इतिहासाच्या तुलनात्मक अभ्यासातून आ.ह.नी बुद्धांच्या विचारांना नवी दिशा दिली आहे.आ.ह.च्या विचारांवर संत कबीर, जगद्गुरू संत तुकाराम महाराज, गोतम बुद्ध, चार्वाक यांच्या विचारांचा विशेष प्रभाव होता. गोतम बुद्ध यांना ते पूर्ण विकसित रूप मानतात. 'सर्वोत्तम भूमिपुत्र: गोतम बुद्ध' या आपल्या पुस्तकात ते म्हणतात, "बुद्धत्व हे गोतमाचे पूर्ण विकसित रूप आहे, परिपक्व फल आहे.बुद्धत्वामध्ये स्वत:ला, इतर मानवांना आणि मानवेतर अशा समग्र बाह्य सृष्टीला नीट जाणणे आहे. जाणण्याच्या या प्रक्रियेत भौतिकशास्त्र वगैरेंच्या पद्धतीने तपशिलात बिनचूक असणे अभिप्रेत नाही.पण अंत:सृष्टी आणि समग्र सजीव-निर्जीव बाह्यसृष्टी यांच्यामध्ये जास्तीत जास्त निकोप नाते कसे तयार करता येईल, याचे आकलन मात्र या प्रक्रियेत अपेक्षित आहे. माणसाला माणूस म्हणून शक्य तितक्या उन्नत अवस्थेप्रत नेण्यासाठी प्रज्ञा, शील आणि करुणा यांचा मिलाफ कसा करावा,याचे मार्गदर्शन अपेक्षित आहे.हे तिन्ही घटक मानवी जीवनात फार महत्वाचे आहेत. प्रज्ञा नसेल तर, शील आणि करुणा यांना आंधळेपण येईल. शील नसेल तर, प्रज्ञा ही खरीखुरी प्रज्ञा न राहता ती विध्वंसक बुद्धी बनेल आणि करुणा निरर्थक

ठरेल.करुणा नसेल तर, प्रज्ञा आणि शील स्वार्थी ठरतील. म्हणून तिन्ही घटकांचे एकत्रित अस्तित्व हवे.गोतम हे बुद्ध झाले, याचा अर्थ त्यांच्या ठायी या तिन्ही घटकांचा असीम विकास झाला. त्यांच्यातील मनुष्यत्वाने अमर्याद उंची गाठली." प्रज्ञा, शील आणि करुणा यांनी युक्त असा समाज त्यांना अभिप्रेत होता. किंवा या गुणांनी माणूस संपन्न होणे यालाच ते खरा विकास मानत होते.

**मनुस्मृती –** आपल्या एकूण अभ्यासात व संशोधनात आ.ह. नी मनुस्मृतीवर जे लेखन केलेले आहे, ते सत्यशोधनासाठी. शोषण व असत्याची मूळे शोधून काढणे हा यामागील प्रमुख उद्देश होता. 'मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती' या पुस्तकाच्या प्रास्तविकात ते लिहितात, "हा ग्रंथ म्हणजे भारताच्या इतिहासातील सामाजिकदृष्ट्या बहुधा सर्वात अधिक विकृत ग्रंथ होय. याच ग्रंथाने सर्वसामान्य लोकांच्या किमान शंभर पिढ्यांसाठी अज्ञान, अपमान, तिरस्कार, लाचारी आणि गुलामगिरीचा वारसा ठेवला. त्यांचा सर्वांगीण अध:पात घडवून आणला. अशा प्रकारे लाचारीचे जिणे हे आपल्याच पूर्वजन्मीच्या कर्माचे फळ आहे, हाच आपला धर्म आहे, नीती आहे, हे विचार त्या लोकांच्या डोक्यात पेरले. शोषितांच्या डोक्यात शोषकांचा मेंदू काम करू लागला. शोषकांचे हितसंबंध हेच आपले हितसंबंध आहेत, असे शोषितांना वाटू लागले.भृगुने मनुस्मृतीच्या आधारे बहुजन समाजाची राबण्याची शक्ती शाबूत ठेवली आणि फुलण्याची शक्ती नष्ट केली.त्याच्या शंभर पिढ्या बिनतक्रार, आनंदाने, समाधानाने आपल्या शंभर पिढ्यांची सेवा करतील, अशी समाजव्यवस्था निर्माण केली." या सत्यशोधनातून शोषणमुक्त समाज निर्मितीचे त्यांचे हे चिंतन निश्चितच खूपच मौलिक व मूलगामी आहे.

ऐतरेय ब्राम्हण, वैदिक धर्मसूत्रे, महाभारतातील स्त्रियां यांवर संशोधन व लेखन करतानांही वरील प्रकारेच शोषणाचे मूळ शोधून सत्याचे अन्वेषण करणे हाच यांमागील हेतू होता हे स्पष्टच आहे.

**4. आ.ह.च्या साहित्यात प्रतिबिंबित होणारे मानसशास्त्रीय विचार:** खरे म्हणजे आ.ह. चे एकूण साहित्यच लक्षवेधी आहे. कोणत्याही काळाला या साहित्याला डावलून पुढे जाताच येणार नाही. प्राचीन कालापासून ते आजतागायत स्त्रियांना शोषण, लाचारी, अन्याय, अत्याचार, मानहानी अशा अनेक प्रकारचे अपमानास्पद जीवन जगावे लागते. याचे मूळ नेमके शोधून आ.ह. नी आपल्या लेखणीतून स्त्रियांना मुक्तीचा मार्गच दिला आहे. खरे तर हे सर्व साहित्यच साहित्याच्या इतिहासातील एक सुवर्णाक्षरातील पान आहे ! साहित्यात समाजाचे प्रतिबिंब पडत असते. तत्कालिन कालखंड, परंपरा, समाजजीवन, समाजातील स्त्री-पुरुष यांचे स्थान इत्यादींची कल्पना त्यावरून येते. आजपर्यंतचे साहित्य अभ्यासले तर निर्विवादपणे स्त्रियांना गौण, दुय्यम, लाचारीचे स्थानच दिलेले आहे. येथी मूळ अनार्यांची मातृसत्ताक पद्धती गेल्यानंतर, पुरुषप्रधान संस्कृतीपासून महाभारताच्या अनुषंगाने महाभारतातील विविध व्यक्तिरेखांचा अभ्यास करतांना आ.ह.चे सूक्ष्म अध्ययन, मानसशास्त्रीय विवेचन यातून त्यांनी तत्कालिन सामाजिक स्थिती, व्यक्तिंचे स्वभाव, वर्तन इत्यादी बाबी स्पष्ट करत शोषण, अन्याय

व विशेषत्वाने स्त्रियांची गुलामगिरी यावर यथार्थ प्रकाश पाडला आहे. ज्यातून स्त्री मुक्ती चळवळीला विशिष्ट दिशेने विचार करण्याचे मार्गदर्शन मिळाले आहे.त्यामुळे धर्म, संस्कृती, समाजव्यवस्था यांचे विकृत स्वरूप यावर विचार करून मूळ कारणांचाच

विचार करण्यासाठी सर्वांना प्रवृत्त केले आहे. **'महाभारतातील स्त्रियां भाग-२'** या पुस्तकातील 'दमयंती' या प्रकरणात त्यांनी नल व दमयंतीच्या वर्तनाचा ऊहापोह मांडताना म्हटले आहे, "प्रत्यक्षात नलाचे व्यक्तिमत्व इतके खुजे असण्याची शक्यता नाही.ज्या लेखकाने पहिल्यांदा नलाचे शब्दचित्र रेखाटले, तोही आपल्या नायकाला अशा रीतीने हीन स्वरूपात रेखाटण्याची शक्यता नाही.ई.स. पूर्व दुसऱ्या मनुस्मृतीची निर्मिती झाली, त्या वेळी स्त्रियांना शक्य तितके दडपून टाकून समाजाला कडव्या पुरुषप्रधान विचारसरणीने आंधळे बनविण्याचा प्रयत्न झाला........या प्रकारामुळे नलाच्या विशुद्ध आणि उत्कट प्रेमाला विनाकारण एक कलंक लावण्याचे काम चरित्रकारांनी केले." एकूणच 'महाभारतातील स्त्रियां भाग-२' या पुस्तकाच्या समारोपात त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे – " पुरुषप्रधानता हे या स्त्रियांच्या असहायतेमागचे एक महत्वाचे कारण आहे.दमयंतीविषयी उपस्थित करण्यात आलेली शंका पुरुषप्रधान मानसिकतेतून निर्माण झालेली आहे.वडिलांच्या शब्दासाठी आईची हत्या करण्याचा आदर्श परशुरामाने घालून दिलेला आहे.भर उन्हात जमदग्नीचे बाण आणण्यासाठी अनवाणी जातांना रेणुकेच्या पायांची जितकी होरपळ झाली, त्यापेक्षातिच्या हृदयाची होरपळ जास्त झाली असेल.उन्हाने मस्तक जितके तापले, त्यापेक्षा अंत:करण जास्त भाजून निघाले असेल. पण थरथरत क्षमा मागण्यापलीकडे ती काही करू शकली नाही.देवयानीचे वडील तिचे नको इतके लाड करतात आणि तिचे अनुचित हट्टही पुरवितात. याउलट, शर्मिष्ठा, सुकन्या, लोपामुद्रा, गांधारी यांचे वडील मात्र आपली राजसत्ता टिकवण्यासाठी आपल्या मुलींच्या सौख्याचा बळी देतात.दाशराजही वरवर मुलीचे हित पाहतांना दिसत असला तरी त्याला तिच्या सुखाची फार काळजी आहे, असे वाटत नाही." आ.ह.च्या या विवेचनापूर्वी महाभारतातील या घटनांचे स्त्रियांच्या विरोधात समर्थनच केले जात होते. पहिल्यांदा आ.ह.नी इतके स्पष्ट, मर्मावर बोट ठेवणारे विवेचन केले, ज्याला मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय व सत्याचा आधार आहे. स्त्रियांच्या अवनतीचे खरे मूळ त्यांनी शोधून काढले, याबद्दल अखिल स्त्रियां त्यांच्या खूप खूप आभारी आहेत. महाभारतातील स्त्रियां ही त्यांची पुस्तके म्हणजे त्यांच्या साहित्यातील स्त्री मुक्तीच्या दृष्टीने अलौकिक असे योगदान आहे.

**समारोप:**

एकूणच भारतीय साहित्याच्या इतिहासात डॉ. आ.ह. साळुंखे याचे योगदान हे अत्यंत महत्वाचेच नाहीतर, अत्यंत मूलभूत आहे. बहुजन समाज, स्त्रियां, दलित ....इत्यादीच्या शोषणमुक्तीसाठी, मानवमुक्तीसाठी केलेला हा अत्यंत प्रामाणिक, कष्टाचा व सर्जनशील असा प्रवास आहे. 'परिवर्तन' हा त्यांच्या साहित्याचा ध्यास आहे तर सत्यशोधन हा श्वास, व नवसर्जन हा आत्मा आहे. या साहित्यावर खूप काही लिहिण्यासारखे आहे, थोड्क्यात ते आकळणारे नाही. केवळ एवढेच म्हणता येईल, झाले बहू, होतील बहू, पण यासम हा !

## संदर्भः

1. साळुंखे आ.ह.[डॉ.] 'तुझ्यासह आणि तुझ्याविना',[२००१] 'लोकायत प्रकाशन', सातारा, श्री. राकेश आ.साळुंखे,प्रथमावृत्ती पृष्ठ- १३२,
2. साळुंखे आ.ह.[डॉ.] 'परिवर्तन : शास्त्रही, कलाही [२०११] 'लोकायत प्रकाशन', सातारा, श्री. राकेश आ.साळुंखे, पृष्ठ- ४७,४८.
3. साळुंखे आ.ह.[डॉ.] [२००७] 'सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुद्ध' 'लोकायत प्रकाशन', सातारा, श्री. राकेश आ.साळुंखे, पृष्ठ – १४.
4. साळुंखे आ.ह.[डॉ.] 'महाभारतातील स्त्रियां भाग -२' [२००४] 'लोकायत प्रकाशन', सातारा, श्री. राकेश आ.साळुंखे, पृष्ठ – ११८, ११९, १२०.
5. साळुंखे आ.ह.[डॉ.] 'मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती' [२०१७,आक्टोबर] 'लोकायत प्रकाशन', सातारा, श्री. राकेश आ.साळुंखे, पृष्ठ – ०५
6. गायकवाड प्रशांत [डॉ.] डिसे. २०१६] 'आ.ह. साळुंखे विचारप्रवर्तक मुलाखती', 'लोकायत प्रकाशन', सातारा, श्री. राकेश आ.साळुंखे,
7. प्रा. राणा अशोक [डॉ.] 'साळुंखे आ.ह.' [२०१५ ] 'लोकायत प्रकाशन', सातारा, श्री. राकेश आ.साळुंखे, प्रथमावृत्ती, पृष्ठ- ०८
8. mr.m.wikipedia.org

KRIPA DRISHTI PUBLICATIONS

Kripa-Drishti Publications
A-503 Poorva Heights, Pashan-Sus Road, Near Sai Chowk,
Pune – 411021, Maharashtra, India.
Mob: +91 8007068686
Email: editor@kdpublications.in
Web: https://www.kdpublications.in

ISBN: 978-93-90847-35-8